# विवेकानंद कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय पर्वत दिन

**कोल्हापूर :** विवेकानंद ज्युनिअर कॉलेज येथे 'इकोक्लब'च्या वतीने आंतरराष्ट्रीय पर्वत दिन साजरा करण्यात आला. कॉलेजमध्ये पर्वतांविषयी पोस्टर प्रदर्शन उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. ए. जे. पाटील व प्रा. एच. जी. पाटील यांनी पाणी, अन्न, जैवविविधता आणि उपजीविकेसाठी पर्वतांचे महत्त्व विद्यार्थ्यांना स्पष्ट केले. जैवविविधता, पर्यावरण संवर्धन मोहीम व शाश्वत पर्वतीय विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि पर्वतीय परिसंस्था आणि लोकांचे संरक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी व समाजाने द्यावयाच्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, प्रा. एम. आर. नवले, प्रा. गीतांजली साळुंखे, प्रा.एस. टी. शिंदे, एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.